# मराठ्यांच्या काळात पेशव्यांनी मोगलाकडून मिळविलेली चौथाई सरदेशमुखीच्या सनदेतुन ब्रिटीशांची तैनाती फौज पद्धतीची निर्मिती - एक विश्लेषण

**प्रा. डॉ. निलय देशमुख**
**महात्मा ज्योतीबा फुले विज्ञान वाणिज्य व विठ्ठलराव राऊत कला महाविद्यालय, भातकुली जि. अमरावती.**



**प्रस्तावना:**

१६ व्या शतकातील तैनाती फौजेचा निर्माता आर्थर वेलस्ली होते असे म्हणता येणार नाही. तर आर्थर वेलस्लीच्या अगोदर शंभर वर्षापूर्वी चौथाई सरदेशमुखीची कल्पना छत्रपती शिवाजी महाराजांनी शोधुन काढली. सुरुवातीला शिवाजी महाराजांची मुलुखाची हद्द पुणे, सुपे व आसपासचे काही किल्ले , त्यांच्या वडीलांच्या जहागीरीच्या बाहेर गेली नव्हती. महाराष्ट्रामध्ये सरदेशमुखीचे अधिकार मिळावे अशी शिवाजीची इच्छा होती. देशमुखांना आपल्या राज्यात शांतता राखण्याचे काम असुन त्यांना दिलेल्या प्रांताचा कर वसुल करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती[१]. जुन्नर व अहमदनगर राज्यातील सरदेशमुखीचे उत्पन्न आपणास मिळावे यासाठी शिवाजीने इ.स. १६४९ मध्ये मोगल बादशहा शहाजनाकडून प्रयत्न केले. परंतू शहाजहानने शिवाजीच्या विनंतीकडे कानाडोळा केला[२]. इ.स. १६५७ मध्ये औरंगजेब दक्षिणेत फौज घेऊन आला. तेव्हा शिवाजीने औरंगजेबाला चौथाई सरदेशमुखी मिळण्याबाबत विनंती केली. तेव्हाही शहाजहानने दखल घेतली नाही[३]. चौथाई सरदेशमुखीच्या हक्कासंबंधि तिसरा उल्लेख पुरंदर (इ.स. १६६५) येथे शिवाजी व राजा जयसिंग यांच्यामध्ये झालेल्या तहाचे बोलणे चालले असतांना झाला आहे. या तहात शिवाजीने विनंती केली की, निजामशाही राज्यातच वडीलोपार्जीत हक्क असल्यामुळे त्या प्रातातुन एक लक्ष होणाची खेडी व महाल आपणास मिळावे. या तहात सरदेशमुखीबदद्ल नव्हेतर चौथाई या हक्काबदद्ल सुद्धा मागणी केलेली आढळते. या मागणीला बादशहाकडून जबाब मिळाला नाही[४]. तरी शिवाजीने हार न मानता आपल्या मागण्या दिल्याच पाहीजे असा त्याने आग्रह धरला. विजापूर गोवलकोंडा, अहमदनगर, कर्नाटक या राज्यातुन चौथाई सरदेशमुखीची वसूली केली. हे मुंबई करांच्या ३० ऑक्टोंबर १६६८ च्या पत्रावरुन स्पष्ट होते[५]. विजापूरकडून ६ लाख, गोवळकोंड्याकडून ५ लाख तसेच इ.स. १६७१ मध्ये मोगलांच्या ताब्यातील खानदेश, बागलान प्रांतातून शिवाजीने चौथाई सरदेशमुखी मिळविली. याचाच अर्थ शिवाजी महाराजांनी चौथाई सरदेशमुखीची अधिकार मोगल बालशहाकडून मिळविले असले तरी त्याची हद्द दक्षिणच्या बाहेर गेली नव्हती[६]. परंतू छत्रपती शाहूच्या काळात बाळाजी विश्वनाथने इ.स. १७१९ मध्ये दक्षिणेतील सहा सुभ्यातुन चौथाई सरदेशमुखीच्या अधिकारची मान्यता मिळविली व मराठ्यांचा उत्तरेच्या राजकारणात प्रवेश झाला. पहील्या बाजीराव पेशवेने शिवाजी महारांच्या धोरणांचा पाठपूरावा करुन हिंदूपद पातशाहीचे धोरण पुढे चालविले[७]. मुगल राज्यात मराठ्याचा दबदबा निर्माण केला. बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवेने इ.स. १७५२ मध्ये दिल्लीच्या बादशहा सोबत कराकरुन दिल्लीचे स्वरक्षण करण्याची हमी घेतली व त्या बदल्यात संपूर्ण भारतातून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा अधिकार मिळविला[८]. बंगालमध्ये कंपनीचे नियंत्रण प्रस्तावित झाल्यावर इंग्रजांनी याच धोरणाचा अवलंब केला. ग.ज. रॉबर्ट क्लायीव्ह, वारंण हेस्टींग्ज यांच्या काळात इ.स.१७६५ मध्ये अलाहाबादच्या तहात सुजाउद्योलाच्या अवध राज्याचे संरक्षण करण्याचे कंपनीने कबूल केले व त्यासाठी लागणारा फौजेचा खर्च नबाबाने करावा असे ठरले[९]. पुढे वॉरंण हेस्टींगने पैशाच्या मोबदल्यात अवध नवाबाला देऊन रोहीलखंड जिंकण्यास मदत केली. त्यानंतर लार्ड कार्नवालीस, सर जॉन शोअर यांच्या काळात कंपनी भारतातील राज्यात आवश्यकतेनुसार फौजा ठेवून त्याऐवजी पैसा घेऊ लागले[१०]. लार्ड वेलस्लीने शिवाजी महाराजांच्या काळापासून ते इंग्रज मराठा दूस-या युद्धापर्यंतच्या काळाचा चिकीत्सक दृष्टीने अभ्यास करुन, त्यांच्यातील बारकावे शोधून त्यापध्दतीला व्यवस्थीत आकार देऊन लार्ड वेलस्लीने तैनाती फौज पध्दती अस्तीत्वात आणली[११]. त्यासाठी आपल्याला पेशवांच्या उत्तरेकडील राजकारणांचा आढावा घ्यावा लागेल.

१. **पेशवा बालाजी विश्वनाथने मुगल बादशहाकडून स्वराज्य चौथाई सरदेशमुखीचे अधिकार मिळविले** - छत्रपती शाहूच्या काळात औरंगजेबाच्या मृत्युनंतर दिल्लीच्या राजकारणात सैय्यद बंधुचे वर्चस्व असल्यामुळे मुगल सम्राट फारुखसियरने सैय्यद बंधूचे वर्चस्व कमी करण्यासाठी सैय्यद हुसेनला दक्षिनेचा सुभेदार म्हणून पाठविले होते[१२]. येथुनच सैयद हुसेनच्या सहकार्याने पेशवा बालाजी विश्वनाथने दिल्लीच्या राजकारणात हस्तक्षेप केला[१३]. इ.स. १७१७ मध्ये सम्राट फारुक सियरने मराठ्याना १० लाख प्रति वर्ष बदल्यात स्वराज्य आणि दक्षिणेतील ६ सुभेच्या चौथाई सरदेशमुखीची मान्यता दिली[१४]. इतिहाकार जदूनाथ सरकार, सरदेसाई आणि रानडे यांनी बाळाजी विश्वनाथचे कार्य मराठा राज्याच्या हितासाठी हानीकारक ठरेल असे विचार व्यक्त केले. शेवटी १३ मार्च १७१९ रोजी बाळाजी विश्वनाथने सैयय्द बंधूच्या मदतीने फारुक सियरचा पराभव करुन रफीदररजाक याला गादीवर बसविले व त्याच्या मदतीने स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी या सनदेची मराठ्यांना प्राप्ती झाली[१५]. स्वराज्याच्या सनदेमध्ये शिवाजी महारांजांनी जिंकलेले प्रदेश स्वराज्यात सामील झाले. दुसरी सनद म्हणजे सरदेशमुखी होय. इ.स. १७१९ मध्ये सम्राटाच्या परवानगीने त्याला पूर्ववत करण्यात आले. तिसरी सनद म्हणजे चौथाई होय. यानुसार मराठ्यांनी १५ हजार सैन्यासह सम्राटाची सेवाकरणे व वार्षीक १० लाख रुपये कर देण्यास संमत झाले. त्यामोबदल्यात त्यांना दक्षिणेच्या ६ सुभ्यावर २५ टक्के चौथाई तसेच १० टक्के सरदेशमुखी गोळा करण्याचा अधिकार प्राप्त झाला[१६].

२. **पेशवा बाजीराव पहीला व उत्तरेच्या राजकारणातून मिळविलेली चौथाई** - सरदेशमुखी.

- **माळव्यातील मोहीम** - पेशवा बाळाजी विश्वनाथच्या कालकिर्दीत उदाजी पवार मल्हारराव होळकरांच्या मदतीने इ.स. १७१५ मध्ये मराठ्यांनी माळवा परीसरातील खरगोण बडवानी, धरणपूरी येथून चौथाई वसुल केली. मांडू आणि महेश्वर त्यांनी नियंणाखाली आणले.

सुमारे एक महिना मराठ्यांनी या भागातून चौथाई सरदेशमुखी वसुल केली[१७]. दक्षिण व उत्तर भारताला जोडणारा माळवाप्रांत असल्यामुळे स्वतःचे राज्य सुरक्षित ठेवण्यासाठी व उत्तरेवर चढाई करण्यासाठी बाजीराव पहील्याने इंदूरचा जमीनदार नंदलाल मंडलोई यांची मदत घेऊन इ.स. १७२३ मध्ये माळव्यावर आक्रमण केले[१८]. याच वेळी निजामाने वजीरपदाचा त्याग करुन दक्षिणेस जाण्यास निघाला असता १८ मे १७२४ रोजी बाजीरावाने नालछा येथे निजामाची भेट घेतली. दक्षिणेतील राज्यामधली चौथाई सरदेशमुखी मराठ्यांना देण्याचे निजामाने मान्य केले[१९].

दिल्लीचा मोगल बादशहा महमदशहाने १७२०-२१ च्या सुमारास आग्रा, माळवा हे दोन सुभे जयसिंहाला दिले होते. हे सुभे स्वतःकडे ठेवून माळव्यावर त्याने आपल्यावतीने गिरीधर बहादूरची नेमणूक केली होती. गिरिधर बहादूर हा राजबहादूरच्या मदतीने स्वतंत्रपणे माळण्याचा कारभार पाहत असे. माळव्यात मराठ्यांना चौथाईचा अमल बसवावयाचा होता , त्यासाठी बाजिरावने २७ नोव्हेंबर १७२८ रोजी माळव्यावर आक्रमण केले. अमझेर व तिरला येथे मल्हारराव व गिरीधर बहादूर यांच्या सैन्याची गाठ पडली. त्यात मराठ्याचा विजय झाला[२०]. उज्जैन व सिरोंज वगळता बहूतेक संपूर्ण माळवा विंद्याद्रींच्या घाटासहीत मराठ्यांच्या ताब्यात आला.

- **पालखेडची कोंडी** - निजामाला दक्षिणेत आपले स्थान मजबूत करायचे होते. त्या मार्गात मराठे त्यांचे प्रतिस्पर्धी होते. मराठ्यांनी दक्षिणेतील सहा सुभ्यातील चौथाई सरदेशमुखीची मागणी केली असता, मराठ्यांचा खरा छत्रपती कोण असा वाद निर्माण केला. तेव्हा शाहूने बाजीरावास दक्षिणेत बोलावून निजामाच्या प्रदेशावर हल्ले सुरु केले[२१]. निजाम पालखेडला येताच मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, चिमाजी आप्पा यांनी निजामाची कोंडी केली. ६ मार्च १७२८ रोजी मुंगी शेगावच्या तहाद्वारे शरण येण्यास भाग पाडले. या तहाद्वारे निजामाने शाहुचा छत्रपती म्हणून सरदेशमुखीचा हक्क मान्य केला[२२].
- **बुंदेलखंड** - बुंदेल्यांचा नेता छत्रसाल व मोगल सरदार महमदखान बंगश याच्यावर १७२८ मध्ये जैतपूर येथे संघर्ष झाला असतांना महमदखान बंगशने छत्रसालचा पराभव केला. तेव्हा छत्रसालने महमद बंगशच्या विरोधात बाजीरावला मदत मागितली[२३]. इ.स. १७२९ मध्ये झालेल्या संघर्षात बाजीरावने महमद बंगशचा पराभव केला. तेव्हा बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल खुष होऊन त्याने बाजीरावला कल्पी, हट्टा, सागर, झाशी, सिरोज, कुंच, अक्रोश आणि हरदेवनगर इ.प्रदेश बाजीरावला दिला[२४].
- **डभईचा लढा ( १७३९)** - मावळ्याप्रमाणे गुजरातमध्ये चौथाई व सरदेशमुखीचे अधिकार असावे असे बाजीरावचे म्हणणे होते. परंतु गुजरात व बंगाल त्यापूर्वी मुलुखगिरीसाठी शाहूकडून दाभाडेकडे सोपविण्यात आले होते. तेव्हा त्यात हस्तक्षेप करु नये असे सेनापती त्र्यंबकराव दाभाडेंची मागणी होती[२५]. इ.स. १७ ऑक्टोंबर १७२९ रोजी बाजीरावाने गुजराथ व माळवा याबाबत शाहुशी पुढीलप्रमाणे करार केला. "प्रांत गुजरात व प्रांत बंगाल वगैरे येथील जिल्हा बाबती व सरदेशमुखीचा अमल आमचे स्वाधीन केला. त्याचा साल दर साल हुजुर राबावयाची मोहीम मुकरार केली. रुपये दोन लक्ष रुपया केली. त्यापैकी महाराज कृपाळू होऊन, आम्ही कर्मढार मसलतीमुळे जाहली. याकरीता महारांजांनी साल दरसाल सदरहू ऐवजापैकी रुपये ५०००० दिले. बाकी रुपये दीड लक्ष एक रुपया राहिले. ते पावने करु येणे प्रमाणे पावने होतील" [२६]. या तहामुळे त्र्यंबकराव दाभाडे संतप्त होऊन बाजीरावचा नायनाट करण्यासाठी त्र्यंबकरावांनी ब्राम्हण - मराठा वाद उकरुन काढला. १ एप्रिल १७३१ रोजी डभई येथे झालेल्या संघर्षात बाजरावाने त्र्यंबकराव दाभाडेंचा पराभव केला.

मराठ्यांना माळव्यातून घालवून देण्यासाठी बादशहाने जयसिंहास २० लक्ष रुपये दिले. डिसेंबर १७३२ ला जयसिंह उज्जेनला पोहचला त्याने मराठ्याविरुध्द युद्धाचा देखावा केला. बादशहाने दिलेल्या रकमेतून काही रक्कम मराठ्यांना देऊन माळव्याबाहेर घालविले. पण मराठ्यांनी पून्हा माळव्यात शिरताच ५ मार्च १७३३ ला जयसिंहाने होळकरांशी तह केला. त्यानुसार ६ लक्ष रुपये होळकरास देण्याचे मान्य केले[२७].

- **बाजीरावाचे उत्तरेकडील मोहीमा** - इ.स. १७३४ मध्ये बाजीरावने राजपुतान्यात प्रवेश केला. बुंदी येथे बुधासिंहाची सत्ता होती. सवाई जयसिंगाने त्याला गादीवरुन दूर करुन जावई दलिलसिंहास दिली. दलिलसिंहाचा जेष्ठ बंधु प्रतापसिंह हा दलिल सिंहास बुंदीचे राज्य मिळाल्यामुळे दुखावला होता. त्याने बुधासिंहाचा पक्ष उचलून धरुन मल्हारराव होळकर व राणोजी शिंदेला मदत मागितली. तेव्हा बुधासिंहाने ६ लक्ष रु.दिले[२८].

दिल्लीच्या दृष्टीने राजपुताना महत्वाचा होता. त्या तयारीला बाजीराव लागला. फेब्रुवारी १७३६ मध्ये तो उदयपूरला गेला असता मेवाडचा राणा जगतसिंहाने भव्य स्वागत केले व चौथाई म्हणून १ लक्ष ६० हजार रुपये मराठ्यांना खंडणी देण्याचे मान्य केले. चौथाईच्या मोबदल्यात बनहाडा परगणा जयसिंहाने मराठ्यांना दिला[२९].

- **भोपाळवर चढाई** - १२ नोव्हेंबर १७३६ मध्ये बाजीरावने भोपाळगडास वेढा दिला. भोपाळचा नबाब यार मोहमंद याचा पराभव करुन त्यांच्यावर चौथाई लागू करण्याची जबाबदारी पेशव्याने मल्हाररावांवर टाकली. तेव्हा नवाब यार मोहमंदशी तह करुन मराठांनी ५ लाखापैकी साडेतिन लक्ष नगदी घोडी आणि मौल्यवान वस्तु मल्हाररावाने नबाबाकडून मिळविली. भोपाळ, भेलसा चंदेरी, बोडशा, नरवर, दतिया जाडवाडा ही ठिकाणे जिंकल्यानंतर त्या क्षेत्रातून खंडणी वसूल करण्याची जबाबदारी पेशव्याने बाजीरावाकडे सोपविली[३०]. बादशाही मुलुखात उतरण्यासाठी बाजीरावने फेब्रुवारी १७३६ च्या सुमारास भदावरच्या मुलुकात प्रवेश केला. १८ फेब्रुवारी १७३६ रोजी भदावरचा राजा अनिरुद्धसिंगचा पराभव करुन तह केला. त्या तहानुसार त्याने मराठ्यांना २० लक्ष रुपये खंडणी देण्याचे मान्य केले. १५ लक्ष रुपये नगदी दिले. पाच लक्ष ओलीस ठेवले[३१].
- **बाजीरावला आळा घालण्यास बादशहाचे प्रयत्न** - मराठ्यांच्या मागण्या पूर्ण न केल्याने बाजीराव पुन्हा उत्तरेत येईल या भितीपोटी बादशहाने बाजीरावचा बंदोबस्त करण्यासाठी सगळ्या मोगल सरदारांना बोलाऊन स्वतःचे स्वरंक्षण करण्यासाठी निजामाला मदतीची याचना केली. पेशव्यांचा बदोबस्त करण्याकरीता निजामाला संधी हवी होती. सरदेशमुखी व चौथाई दक्षिणेच्या सहा सुक्ष्यातून मराठे वसुल करीत असे. आता देशपांडे म्हणून पाच टक्के नवीन कर पेशव्याने बादशहाकडून मंजूर करुन घेतला होता[३२]. त्यामुळे निजामाचे उत्पन्न आणखी कमी होणार होते. त्यातल्या त्यात बाजीरावला उत्तरेत सातत्याने यश मिळत असल्यामुळे निजाम चिंतेत होता. म्हणून इ.स. १७३६ मध्ये निजाम बादशहाच्या स्वरक्षणाकरीता दिल्लीस गेला. बाजीरावने दिल्लीवर ३० मार्च १७३७ रोजी आक्रमण केले व तलवारीच्या बळावर बाजीरावने बादशहाकडून चौथाई व सुभेदारी यांच्या सनदा बादशहाकडून प्राप्त करुन घेतल्या.

**बाळाजी बाजीरावने उत्तरभारतातून मिळविलेली चौथाई**

बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशव्याने आर्थिक उद्योग प्राप्त करण्यासाठी त्यांनी उत्तर भारताची मोहीम हाती घेतली. माळव्यामध्ये मराठ्यांना मिळालेला फायदा समाप्त करुन सम्राटाने आजीमुल्लाखानाला माळव्यात पाठविले. तेव्हा नानासाहेबाने मुगल सम्राटाला माळवाप्रांत आणि ५० लक्ष रु.ची मागणी केली. तेव्हा निजामाने पेशाव्यांच्या विरोधात मुगल बादशहाच्या मदतीसाठी माळव्याकडे कुच केले. परंतू त्याचवेळी चिमाजी आप्पा मरण पावले[33]. त्यांच्या मृत्यूनंतर इ.स. १७४१ मध्ये एदलाबाद येथे पेशव्याने निजामाची भेट घेऊन १५ लक्ष रु.मिळविले. इ.स. १७४१ मध्ये पेशवा छोलपुरला जाऊन मोगल सम्राटावर दबाव टाकून शाही सनदा मिळविण्यासाठी सम्राटाकडून वचन घेतले व माळण्यावर अधिकार प्रस्तापित केला.

### बाळाजी बाजीराव आणि बुंदेलखंड

इ.स. १७२९ मध्ये बुंदेलखंडचा राजा छत्रसालने बाजीरावला बुंदेलखंडराज्याचा तिसरा हिस्सा बक्षीस दिला होता. परंतु तो प्रदेश ताब्यात आला नव्हता. तेव्हा इ.स. १७४२ मध्ये ज्योतिबा शिंदेना बुंदेलखंडाचा राजा नरेश वीरसिंहदेवकडे राजस्व वसुल करण्यासाठी पाठविले. परंतू त्यांना कपटाने ठार मारले. तेव्हा पेशव्यांनी क्रोधीत होऊन विरसिंहदेवला कैदी बनविले. बुंदेल खंडाचा कारभार बघण्यासाठी शिंदे, होळकर, पवार यांची नियुक्ती केली[34]. इ.स. १७४४-४६ मध्ये पेशव्याने बुंदेलखंडाचा दौरा करुन संपुर्ण बुंदेलखंड मराठा साम्राज्यास विलीन केला.

### बाळाजी बाजीराव व राजपुताणा

जयपूर, भरतपूर आणि डोंगरपुर मध्ये मराठ्यांनी आपला दबदबा निर्माण केला होता. जयपुरचा राजा जयसिंहाच्या मृत्युनंतर ईश्वरसिंग आणि माधवसिंग या भावामध्ये गादीसाठी संघर्ष सुरु झाला होता. त्यामुळे जयपुरच्या राज्यात हस्तक्षेप करण्याची संधी मराठ्यांना मिळाली. इश्वसिंगाची बाजु शिंद्यानी तर माधवसिंहाची बाजु मल्हारराव होळकरांनी घेतली. इ.स. १७४७ मध्ये शिंद्यांनी कोटाच्या राजापासुन ४० लाख रु. मिळविले. त्यामुळे मल्हारराव होळकरांना राग आला आणि त्यांनी माधवसिंहावर दबाव टाकून ६५ लाख रु. मिळविले. जयपुरच्या संघर्षात शिंदे आणि होळकर यांच्यात मतभेद झाल्यामुळे पेशव्याने इ.स. १७४८ मध्ये जयपूरच्या संबंधातमध्यस्थीची भूमीका घेऊन मतभेद कमी करण्याचा प्रय़त्न केला[35]. तरीही होळकरांनी इश्वरसिंहाला त्रास देऊन त्यांच्याकडून २ लाख रुपये वसुल केले. त्यामुळे इश्वरसिंहाने इ.स. १७५० मध्ये आत्महत्या केली. जयपुरच्या राज्यात मराठ्यांनी हस्तक्षेप केल्याने मराठ्यांच्या प्रतिष्ठेला झटका बसला. तरीही माधवसिंहाने १० लाख रुपये वार्षीक कराच्या रुपात मराठ्यांना देत राहले. होळकर आणि शिंदे यांनी जयपुरच्या राज्यात हस्तक्षेप केल्याने राजपुतांनी त्यांचा विरोध केला. मराठ्यांनी राजपुतांची सहानुभूती गमावली[36].

भरतपुरचा राजा सुरजमल जाटाकडे मराठ्ांनी ४० लाख रुपयांची मागणी केली . सुरजमलने नकार देताच मल्हारराव होळकरांनी भरतपुरला वेढा दिला. त्यात मल्हाररावांचा मुलगा खंडेराव मारल्या गेला. तेव्हा सुरजमल जाटांनी मल्हाररावांच्या विरोधात जयप्पा शिंदेना मदत मागीतली. तेव्हा रघुनाथ पेशव्याने जाट राजा सोबत संघर्ष समाप्त करुन ३.० लक्ष रु. मिळविले व सुरजमल स्वतंत्र केले[37].

इ.स. १७२८ मध्ये होळकरांनी मारवाडवर अधिकार प्राप्त करुन सुद्धा मराठ्यासोबत मारवांडचे संबंध सुधारले नव्हते. मारवाडचा शासक अभयसिंगाच्या मृत्युनंतर रामसिंह व बख्तसिंह यांच्या मुलामध्ये मारवाडच्या गादीबाबत संघर्ष सुरु झाला. तेव्हा मल्हारराव होळकर राजगादीच्या संघर्षात तटस्थ राहीले. इ.स. १७५२ मध्ये जोधपुरचा राजा बख्तसिंह याने मेवाडचा शासक रामसिंगास पराभूत करुन जोधपुरचा शासक बनला. तैव्हा रामसिंहाने शिंदेच सहकार्य घेऊन मेवाड जिंकण्याचा प्रयत्न केला. बखसिंहाचा मृत्युनंतर मारवाडचा राजा विजयसिंह झ ाला. त्याचा इ.स. १७५४ मध्ये शिंद्यांनी पराभव केला[38]. त्याचवेळी रामसिंहाने नागोर जिंकून घेतले. पेशव्यांच्या इच्छेविरुद्ध शिंदे अजमेर, जालैर आणि माळवा जिंकण्यासाठी पुढे सरसावले. त्याचवेळी मारवाडचा राजा विजयसिंह आणि शिंदे यांच्यामध्ये समझोत्याबद्दल मतभेट होऊन जयप्पा शिंदेची हत्या झाली. त्यामुळे मराठ्यांनी रागाच्या भरात जोधपुरवर आक्रमण केले आणि विजयसिंहाने मराठ्यांच्या विरुद्ध रोहीले, अवधचा नबाब आणि मुगल सम्राट यांचे सहाकर्य घेतले. इ.स. १७५६ मध्ये पराभुत होऊन त्यांनी ४० लाख रुपये आणि अजमेर राज्य देऊन संघर्ष समाप्त केला. जनकोजी शिंद्यांनी कराराचे उल्लघन केले असा आरोप केला म्हणून रुपये १.५० लाख प्राप्त केले व अजमेरवर स्वामीत्व मिळविले[39].

### जयपुर आणि उदयपुरमधुन पैसा प्राप्त करण्याचा प्रयत्न

इ.स. १७५३ मध्ये मल्हारराव होळकर आणि रघुनाथ पेशव्यांनी पैसा मिळविण्यासाठी जयपुरवर आक्रमण केले. जयपुरचा राजा माधवसिंहाने १० लाख रु. देऊन वाद मिटवीला. परंतू १७५७, १७५८ आणि १७५९ मध्ये शिंदे आणि होळकराने आक्रमण करुन ११ लाख रुपये आणि ३६ लाख रुपये वेगवेगळे मिळविले. त्याचवेळी होळकर जयपुरवर आक्रमण करण्यासाठी गेला असता नानासाहेब पेशव्याने दत्ताजी शिंदेच्या सहकार्याकरीता होळकरांना पाठविले. इ.स. १७५४ मध्ये उदयपुरचा राजा प्रतापसिंहाचा मृत्यु झाला. त्याच्या मृत्युनंतर शाक्तो आणि चुडावत यांच्यामध्ये गृहयुद्ध झाले. तेव्हा रघुनाथ पेशव्याने मध्यस्थी करुन तेथील सम्राटाला शिक्षा केली व ४ लाख रुपये देण्याचे आश्वासन मिळविले[40].

पेशव्याने उत्तर भारताच्या मोहीमेकरीता मराठा सरदारांना स्वतंत्रता दिली असली तरी त्यांचा व्यवहार चांगला नसल्याने त्यांनी स्वतःच्या स्वार्थाकरीता राज्यकर्ते समजुन व्यवहार केला. आपआपसातील मतभेद व द्वेषाच्या कारणांनी त्यांनी मराठा राज्याच्या हीताची नाचक्की केली. पैशाच्या लालसेपोटी राजपुतासारखा मित्र गमावला. त्याचे दुषपरिणाम पानीपतच्या तिस-या युद्धता झाले.

### माधवराव पेशवे व दक्षिणेतील राजकारण

राक्षसभुवनाच्या युद्धात माधवराव पेशव्याने निजामाचा पराभव करुन त्यांच्यावर औरंगबादचा तह लादला. ह्या पराभवानंतर निजामाने पेशव्याविरुद्ध संघर्ष करणे सोडून दिले व तो त्याचा मित्र बनला. त्यानंतर माधवरावांनी आपले लक्ष हैदरअलीकडे वळविले. त्यांच्यावर १७६४, १७६७, १७६९ व १७७० अशा चार मोहीमा काढून त्याला वटणीवर आणले. शेवटच्याच मोहीमेत त्र्यंबकराव पेठेनी मोतीतलावाच्या लढाईत हैदरचा पराभव केला . ह्या युध्दात हैदर व त्याचा मुलगा टीपुसुलतान मराठ्यांच्या हातात पडणार अशी परिस्थीती निर्माण होताच ते थोडक्यात बचावले. २१ जून १७७२ रोजी किकरीच्या मुक्कामावर त्र्यंबकराव पेठेनी हैदरवर तह लादला. या तहात मराठ्यांना ५० लाख रुपये द्यावे,

त्यापैकी २५ लाख नगदी व २५ लाखाचे जवाहीर मिळविले. ह्या तहाने हैदरचा कायमचा बंदोबस्त करण्याची महत्वाकांक्षा ५० टक्के झाली नसली तरी त्याच्या वाढत्या सत्तेला काही प्रमाणात आळा बसला[41].

### लार्ड वैलस्लीची तैनाती फौज व भारतीय राज्ये

माधवराव पेशव्यांच्या मृत्युनंतर त्यांचा भाऊ नारायणराव पेशवा झाला. परंतू त्याचा चुलता रघुनवाथरावाने आपली पत्नी आनंदीबाईच्या मदतीने ऑगस्ट १७६३ मध्ये त्याचा वध केला व पेशवे पदावर आरुढ झाला. परंतू नाना फडणविसांनी राघोबाला पेशवा म्हणून मान्यता देण्यास नकार दिला. त्यामुळे नाराज होऊन रघुनाथराव पेशवे मुंबईला इंग्रजांच्या आश्रयाला गेला. परिणामी इंग्रज व राघोबा यांचे दरम्यान ६ मार्च १७६५ रोजी सुरतचा तह झाला. या तहानुसार इंग्रजांनी राघोबाला पेशवे पदी बसविण्याचे आश्वासन दिले[42]. मोबदल्यात राघबोने इंग्रजांना साष्ठी, वसई आणि ठाणे प्रदेश देण्याचे मान्य केले. परंतू मुंबईचा ब्रिटीश गव्हर्नर वॉरण हेस्टींगने हा तह धुडकावून लावला. हेस्टींगच्या आदेशानुसार मुंबई सरकारने कर्नल ऑगस्टच्या नेतृत्वाखाली एक सेना मराठयांविरुद्ध पाठविली[43], परंतू ते पराभूत झाले. तेव्हा इंग्रजांच्या विरोधात मराठे, निजाम व हैदरअली एकत्र येऊन त्यांनी १७८१ मध्ये इंग्रजांचा पराभव केला. इ.स. १७८२ रोजी महादजी शिंदेनी सालबाई चा तह केला. पुढे महादजी शिंदेने डिब्राउंन या फ्रेंच सेनापतीला आपल्या नोकरीत रुजु करुन आधुनिक पध्दतीचे कवायती फौज निर्माण केली. म्हणूनच वॉरण हेस्टींगजने नंतर आलेले मॅकफरसन, लार्ड कानवॉलीस, सर जॉनशोअर यांनी मराठ्यांशी वैमनस्य होणार नाही याची काळजी घेतली[44].

लार्ड वेलस्ली भारतात आल्यानंतर कंपनीच्या राज्याचा विस्तार करण्यासाठी त्यांनी प्रभावशाली अस्त्राचा उपयोग केला त्यालाच तैनाती फौज पध्दती म्हणतात. बंगालमध्ये कंपनीचे नियंत्रण प्रस्तापित झाल्यावर इंग्रजांनी याच धोरणाचा अवलंब केला. १७६५ मध्ये अलाहाबादच्या तहात शुजाउद्दोलाच्या अवध राज्याचे स्वरक्षण करण्याचे कंपनीने कबूल केले व त्यासाठी लागणा-या फौजेचा खर्च नबाबाने करावा असे ठरले[45]. पुढे वारण हेस्टीगने पैशाच्या मोबदल्यातच नबाबाला रोहीलखंड जिंकण्यास मदत केली. त्यानंतर कंपनी भारतातील राज्यात आवश्यकतेनुसार फौजा ठेवून त्याऐवजी पैसे घेऊ लागली[46]. आर्थर वेलस्कीच्या साम्राज विस्ताराच्या धोरणातून इंग्रज मराठा दुसरे युद्ध सुरु झाले. (१८०३-१८०५). इ.स. १८०३ मध्ये गव्ल्हेरचे शिंदे यांनी सुर्जी अंजनगावचा आणि नागपूरच्या भोसल्यांनी देवगावचा तह करुन तैनाती फौज पद्धतीचा स्विकार केला.

### तैनाती फौज स्विकारणारी राज्ये

१. **वेलस्ली आणि हैदराबादचा निजाम** - साम्रजवादी नितीचा बळी सर्व प्रथम निजाम ठरला. इ.स. १७९५ मध्ये मराठ्यांकडून पराभूत झाल्याने निजाम दुबळा बनला. त्याने नाईलाजाने इ.स. १७९८ मध्ये इंग्रजांची तैनाती फौज स्विकारली. ज्यानुसार त्याला त्यांच्या राज्यात इंग्रजांची ६ बटालीयन फौज बाळगावी लागली. तसेच निजामाला त्याच्या चाकरीवरुन फ्रेचांना मुक्त करावे लागले. त्यामुळे फ्रेंचाचा हैदराबादावरील प्रभाव कमी झाला. इ.स. १८०० मध्ये निजामाने इग्रजांशी आणखी एक तह केला. ज्यानुसार त्याने आर्थीक मोबदल्यात हे सर्व प्रदेश इंग्रजांच्या हवाली केले. जे त्याच्या तिस-या आणि चौथ्या युध्दात प्राप्त झाले होते[47].

२. **वेलस्की आणि मैसुर** - म्हैसुरचा शासक टिपू सुलतानाने इंग्रजांची तैनाती फौज नाकारली. इंग्रजांशी संघर्ष सुरु ठेवला. परंतु १७९९ च्या इंग्रज मैसुर युद्धात टिपू मारला गेला. टिपूनंतर मैसुरचा शासक राजा कृष्णरावने तैनाती फौज स्वीकारुन आपला बराच मोठा भुप्रदेश इंग्रजांनी दिला[48].

३. **वेलस्ली आणि अयोध्या** - वेलस्लीने अयोध्याचे राज्य ब्रिटीश साम्राज्यात विलीन करण्यासाठी एक योजना आखली. त्याने नबाबावर गैर व्यवस्थेचा आरोप लावला. तसेच भारतावर झमानशहाच्या आक्रमणाची भिती निर्माण केली. नबाबाने आपली सेना भंग करावी व इंग्रजी फौज बाळगावी असा वेलस्लीने आग्रह धरला. परंतू नबाबाने त्यास नकार दिला. त्यामुळे नबाबाने गादीवरुन पाय उतार व्हावे असा त्याने आग्रह धरला. शेवटी विवश होवून अयोध्याच्या नबाबाने तैनाती फौजेचा स्विकार केला. यानुसार त्याने अयोध्येमध्ये सेनेचे विघटन करुन इंग्रजी फौजेत वाढ केली. नबाबाच्या दरबारात एक इंग्रज रेसीडन्ट राहू लागला. त्याला नबाबाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याचे अधिकार देण्यात आले. नबाबाने त्याचे जवळजवळ अर्धे राज्य म्हणजे रोहील खंड , गोरखपूर आणि गंगा यमुनेच्या दरम्यानचा प्रदेश इंग्रजांना दिला[49].

४. **वेलस्ली आणि मराठे** - इ.स. १८०३ मध्ये ग्वाल्हेरचे शिंदे यांनी सुर्जी अंजनगावचा आणि नागपूरच्या भोसल्यांनी देवगावचा तह करुन तैनाती फैज स्विकारली. परंतू या मराठा सरदारांनी आपल्या पदरी इंग्रजी फौज बाळगण्यास नकार दिला[50].

तैनाती फौज लादुन व युद्ध करुन वेलस्लीने काही राज्ये ब्रिटीश संरक्षणाखाली घेतली. या व्यातिरिक्त काही राज्यांनी गैरकारभाराचा आरोप करुन तिही राज्ये वैलस्लीने ताब्यात घेतले. त्यात कर्नाटक, तंजावर, सुरत आणि फरुकाबाद या राज्याचा समावेश होता.

### निष्कर्ष -

लार्ड वेलस्लीने तैनाती फौजेची निर्मीती केली तरी वेलस्ली तैनाती फौजेचा निर्माता होता असे म्हणता येणार नाही. तर त्याच्यापूर्वी १००-१५० वर्षा अगोदर हिंदी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी चौथाई व सरदेशमुखी शोधून काढली. त्यांनी विजापूर, गोवलकोंडा, अहमदनगर, कर्नाटक या राज्यातुन चौथाई सरदेशमुखी वसुल करुन त्या राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी घेतली. पुढे छत्रपती शाहूच्या काळात बाळाजी विश्वनाथने मोघल बादशहा कडून स्वराज्य चौथाई सरदेशमुखी , सरदेशपांडे या सनदामिळवून इ.स. १७१९ मध्ये त्याला कायदेशीर स्वरुप मिळविले. बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशव्यांच्या काळात पेशव्याने इ.स. १७५२ मध्ये मोगल बादशहा सोबत करार करुन मोगल राज्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी घेतली व मराठ्यांना संपूर्ण भारतात चौथाई सरदेशमुखी वसूल करण्याचा अधिकार प्राप्त केला. याच मराठ्यांच्या चौथाई सरदेशमुखी या पध्दतीचा ब्रिटीशांनी अभ्यास करुन त्याला सुधारित रुप देऊन लार्ड वेलस्लीने तैनाती फौज पध्दती अमलात आणली. ७ वर्षाच्या शासन काळात त्याने भारतातील प्रमुख सतांना पराभूत करुन कंपनीच्या प्रभावाखाली भारतातील सत्ता मजबूत केली.

### संदर्भ ग्रंथ सूची ( Biblography)

| | | |
|---|---|---|
| १. | रानडे, महादेव गोविंद; | "मराठी सत्तेचा उत्कर्ष"; वरदा, सेनापती बापटच मार्ग पुणे, प्रथमावृत्ती १ जाने १९९५ पृ.क्र.१८४. |
| २. | सरकार, जदुनाथ (अनुवादक मदनलला जैन;) | "शिवाजी और उनका युग"; पृ.क्र.१३४ |
| ३. | रानडे, महादेव गोविंद | "मराठी सत्तेचा उत्कर्ष"; वरदा प्रकाशन पृ.क्र.१६५ |
| ४. | गद्रे, प्रभाकर; | "मराठी राज्या आणि मराठी लोक"; विणा प्रकाशन नागपूर १९९ पृ.क्र.७६. |
| ५. | Rande, M.G. ; | "Rise of the Maratha Power"; University of Bombay, 1961, P.94 |
| ६. | Editor Mujumdar, R.C. ; | "The Maratha Supretnancy"; The lictory of India (Modern Times), Surseet Publications, Delhi, 1978, P.89. |
| ७. | Rande, M.G. ; | "Rise of the Maratha Power"; Publication Division, Ministry of Information and Broadcasting, Delhi 1996, P.117 |
| ८. | Duff, James Grant; | "History of the Maratha's"; Voll.II, Low Price Publication, 1863, P-201. |
| ९. | जैन डॉ. हुकुमचंद (अनुवादक, प्रा.म.म.मार्डीकर) ; | "आधुनिक भारताचा इतिहास";, K Sagar Publications, Pune, 2010, First Edition, Jule 2010, P.36 |
| १०. | दीक्षित, नी.सी. ; | "भारताचा इतिहास"; प्रकाशन मनोहर पिंपळपुरे (इ.स.१५२६ ते १९४७) पहीली आवृत्ती, जून २००४, पृ.क्र.२०२. |
| ११. | ब्रेद्रे , वा.सी. ; | "छत्रपती शिवाजी महाराज पार्श्व पब्लीकेशन , पुणे, द्वितीय आवृत्ती, १८ मार्चत २०१९, पृ.क्र.४२०. |
| १२. | सरदेसाई, गो.स. ; | "मराठी रियासत"; खंड ५, पृ.१०१, १२०. |
| १३. | मुळ साधन ; | "अप्रकाशीत कागद"; दप्तर क्र.५२, पुंडके क्र.४, पत्र क्र.२३६२५ (४३२५१) पुणे अभिलेखागार पुणे. |
| १४. | Sardesai G.S. ; | "New History of the Maratha"; Vol-2, P.270. |
| १५. | पटवर्धन, पा.ना.; | त्रैमासिक वार्षिक इतिवृत्त शके १८३७ , पृ.१४१ |
| १६ | सरदेसाई.गो.स. ; | संपा., स.नि.का. पत्र क्र. १९३, पृ.२२०. |
| १७. | खोब्रेर, वि.गो. ; | "महाराष्ट्राचा इतिहास;" भाग-२; पृ.२३१,२४० |
| १८ | Dutf, Grant; | "History of the Maratha"; Vol I.P.170 |
| १९ | Sarkar, Judunatha; | "Fall of the Mughal Empire"; Vol 2 P.60,6 |
| २० | एतिहासिक संकीर्ण निबंध , खंड | ५, पृ.८९ |
| २१ | ऐतिहासीक लेखसंग्रह खंड ४ | पृ..७२०, ७९५ |

२२ न्यु लाईट ऑन ओरिजीन ऑफ होळकराज ऑल इंडिया ओरिएंटल कॉन्फरन्स, उज्जैन

२३ गुजर , डॉ. यादव, "मल्हारराव होळकर आणि त्यांचा काळ"; प्रकाशक डॉ. यादव गुजर, प्रथम आवृत्ती, जाने १८८१, पृ.क्र.७०.

२४ वखरे, ग.ह. कुळकर्णी, ; "मराठ्यांचा इतिहास, मराठी सत्तेचा उत्तरार्थ"; खंड तिसरा प्रकाशन , महाराष्ट्र विद्यापिठ, ग्रंथनिर्मीती मंडळ, महात्मा गांधी मार्ग, नागपूर ११, कॉन्सिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे ३०, प्रथमावृत्ती १९८६, पृ.क्र.४०-४५

२५ IBID

२६ सिन्हा, एच.एन, "दी राईज ऑफ पैशवाज"; इंडीयन प्रेस पब्लिकेशन, प्रा.लि. इलाहाबाद. १९५४, पृ.क्र.४५.

२७ पुरंदरे दप्तर खंड २ ला पत्रांक २५६, पृ.क्र.१४३.

२८ IBID

२९ मराठी रियासत खंड ४ (पेशवा बाजीराव) पृ.क्र. २७४

३० पेशवे दप्तर खंड १५, पत्र क्र.९८, सरदेसाई , गो.स.

३१ राजवाडे लेखासंग्रह भाग-२, ऐतिहासिक प्रस्तावना पृ.क्र.७१, लेखांक १०५, राजवाडे वि.ला.

३२ काळे मा.म. नागपूरकर भोसल्यांचा इतिहास, पृ.क्र. ७३
३३ काव्यनिहाय ऐतिहासिक पत्र यादी वगैरे, लेखांक १७६, पृ.क्र.१८० (सं.पा.) ,सरदेसाई, Bundelkhand under the Moratha.
३४ मराठी रियासत P.N.125 Andare B.R. (पेशवा बाजीराव); पृ.क्र. ५५६. सरदेसाई, गो.स.
३५ पेशवे दप्तर खंड, पत्र क्र.१३०, पृ.क्र.५०, सरदेसाई गो.स. भवानी पंडितादी बखर, पृ.क्र.८ (सपा) कोलटकर, श.गो.
३६ Sketch of History Bhosla Family Taken from an old domestic together with account of administration, Pg.No.4, Janoji Bhosle , this page No. 11, Kalarcade S.G.
३७ इंगळे डॉ. राम; “होळकरशाहीचा संस्थापक”; विश्वभारती प्रकाशन, नागपूर, प्रथम संकलन १५ ऑगस्ट १९९२, पृ.क्र.३०.
३८ पुरंदे, गो.मा., “ऐतिहासिक गाजलेले रणसंग्राम”; ब्रम्हचा प्रकाशन, नागपूर १५, प्र.आ. १ ऑक्टों. पृ.क्र.८०.
३९ Letter from the Mumbai British Government under Warng Hestings, First battle British maratha War 6 March 1775, National Archieves of India.
४० Lewis Martin D.(Ed). The British in India Inferialism or Trusteeship/ Baston D.C. Health 1966, P.G. No.46.
४१ IBID
४२ Griffiths P.J. The British Impact on India London Mac Denold 1952
४३ Proceeding of the Government of India in Home, Judicial Political and Special Departments, Private Papers, National Archives of India .
४४ Home Department Circular letter No. 46, Poll dated 22 feb 1805, in File No. 103/805 Poll.
४५ Letter from the Haydrabad Nizam, to Lord Wellesly, East India Company, Governer Journal Mumbai, 25 March, 1798, National Archives , Delhi.
४६ Lewis Nortin – The British in India- Imferialism or Trusheeship / Baslan D.C. Helth 1966, P.N.116.
४७ Secret – Intellegence Bareau, Govt of India Daily Summary of Information, 23 Nov 1797, Vidharbha Archives Nagpur.
४८ Home Department Circular letter no. 90, Poll dated 18 July 1800, in File No. 65/1800 Poll.
४९ Letter from the East India Company, under Lord Wellesly second battle, British Maratha War and Pact Surji Anjangaon - 1803, National Archives of India.
५० IBID